# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 04 April 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०४ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा समारोप–दोन्ही सदनांचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब
- केंद्रीय मंत्रिमंडळाची देशातल्या चार रेल्वे प्रकल्पांना मंजुरी–गोंदिया बल्लारशा दुहेरीकरण कामाचा समावेश
- पुण्याच्या दीनानाथ रुग्णालयातील घटनेच्या चौकशीचे मुख्यमंत्र्यांचे आदेश
- ज्येष्ठ अभिनेते मनोजकुमार यांचं निधन–उद्या मुंबईत अंत्यसंस्कार

आणि

- नांदेड जिल्ह्यात ट्रॅक्टर विहिरीत कोसळून सात महिला शेतमजुरांचा मृत्यू

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज समारोप झाला. दोन्ही सदनांचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब झाल्याची घोषणा करण्यात आली. ३१ जानेवारीपासून सुरू झालेल्या या अधिवेशन काळात लोकसभेत ११८ टक्के कामकाज झाल्याची माहिती अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दिली, राज्यसभेत या अधिवेशन काळात ११९ टक्के कामकाज झाल्याचं, सभापती जगदीप धनखड यांनी सांगितलं. लोकसभेत १६ तर राज्यसभेत १४ विधेयकं संमत झाली. या अधिवेशनात भरीव विधायक कामकाज झाल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं.

वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभेत १४ तास तर राज्यसभेत १७ तास चर्चा झाली, चर्चेदरम्यान एकदाही व्यत्यय आला नाही असं रिजीजू यांनी सांगितलं. हे विधेयक सरकारने बळजबरीने पारीत करून घेतल्याचा काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या

सोनिया गांधी यांचा आरोप रिजिजू यांनी फेटाळून लावला. सभापती ओम बिर्ला यांनीही गांधी यांचं हे विधान दुर्दैवी असल्याचं म्हटलं आहे.

****

केंद्रीय मंत्रिमंडळाने देशातल्या चार रेल्वे प्रकल्पांना आज मंजुरी दिली, एकूण १८ हजार ६५८ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पांमध्ये गोंदिया बल्लारशा मार्गाच्या दुहेरीकरण कामाचा समावेश आहे. माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. चार हजार ८१९ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पामुळे विदर्भ तसंच मराठवाडा विभागाला लाभ होणार असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – अश्विनी वैष्णव, मंत्री, माहिती प्रसारण**

या रेल्वे प्रकल्पांसह सहा हजार ८३९ कोटी रुपये खर्चाच्या व्हायब्रेण्ट व्हिलेज अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

****

पुण्याच्या दीनानाथ रुग्णालयातील घटनेच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या घटनेची चौकशी करण्यासाठी पुण्याच्या धर्मादाय सहआयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. दरम्यान, या चौकशीत जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले, त्या आज नाशिक इथं पत्रकारांशी बोलत होत्या. सदर रुग्णालयात प्रसुतीसाठी आलेल्या एका गर्भवतीवर, अनामत रक्कम भरल्याशिवाय शस्त्रकियेला सदर रुग्णालयाने नकार दिला, उपचाराला विलंब झाल्याने, दुसऱ्या रुग्णालयात जुळ्या मुलींना जन्म दिल्यावर या महिलेचा मृत्यू झाला. राज्यातील कुठल्याही रुग्णालयात अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत असल्याचं सांगत, धर्मादाय रुग्णलयांमध्ये एक आरोग्यदूत नेमणार असल्याचंही मिसाळ यांनी सांगितलं.

****

प्रसिद्ध चित्रपट अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक मनोजकुमार यांचं आज सकाळी मुंबईच्या कोकिलाबेन रुग्णालयात निधन झालं, ते ८७ वर्षांचे होते. विशेषतः देशभक्तिपर चित्रपटांमध्ये भूमिका केलेल्या मनोज कुमार यांना भारत कुमार या

नावानं ओळखलं जात होतं. चित्रपटसृष्टीतल्या त्यांच्या कारकिर्दीचा हा संक्षिप्त आढावा –

**२४ जुलै १९३७ रोजी तत्कालीन वायव्य सिंध प्रांतातल्या एबटाबाद इथे जन्मलेले मनोजकुमार यांचं मूळ नाव हरिकृष्ण गिरी गोस्वामी असं होतं. वो कौन थी, शहीद, हिमालय की गोद में, गुमनाम, पत्थर के सनम, नीलकमल, रोटी कपडा और मकान, शिर्डी के साईबाबा, क्रांती, उपकार आणि पूरब और पश्चिम हे त्यांचे चित्रपट प्रचंड गाजले. चंदेरी पडद्यावर देशभक्त नायक म्हणून त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखांमुळे त्यांना भारतकुमार हे टोपणनाव मिळालं. चित्रपट सृष्टीत त्यांनी दिलेल्या योगदानासाठी त्यांना चित्रपट सृष्टीतल्या सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्कारानं तसंच पद्मश्री सन्मानाने गौरवण्यात आलं होतं.**

मनोजकुमार यांच्या पार्थिव देहावर उद्या सकाळी अकरा वाजता मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनोजकुमार यांना श्रद्धांजली वाहिली आहे. तर देशप्रेमाची भावना रुजवणारा महान अभिनेता गमावला असल्याची शोकभावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

****

राज्यांनी परस्परांच्या संस्कृती परंपरांचा आदर केल्यास `एक भारत श्रेष्ठ भारत` निर्मितीचं स्वप्न साकार होईल, असा विश्वास राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी व्यक्त केला आहे. राजस्थान आणि ओडिशा या दोन राज्यांचा स्थापना दिवस आज मुंबईत राजभवनात साजरा करण्यात आला, त्यावेळी राज्यपाल बोलत होते. ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम घेण्यात येतो.

****

महाराष्ट्र सरकारने उत्तर कर्नाटकात पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी वारणा आणि कोयना प्रकल्पातून कृष्णा नदीत, किंवा उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडावं अशी मागणी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं असून, गेल्या अनेक वर्षांपासून कर्नाटक मधल्या नागरिकांची पिण्याची पाण्याची व्यवस्था करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल महाराष्ट्र सरकारचे आभार मानले आहेत.

****

नांदेड जिल्ह्यात मजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर विहिरीत कोसळून झालेल्या अपघातात सात महिला मजुरांचा मृत्यू झाला. वसमत तालुक्यातील गुंज इथले काही शेतमजूर आज सकाळी एका ट्रॅक्टरमधून नांदेड तालुक्यातील आलेगाव इथं जात असतांना, आलेगाव शिवारात ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत सात महिलांचा मृत्यू झाला तर दोन महिला आणि एका पुरुषाला वाचवण्यात यश आलं आहे.

या अपघातातील मृतांच्या कुटुंबियांविषयी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. मृतांच्या कुटुंबाला पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये तर मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. जखमींना ५० हजार रुपये मदत दिली जाणार आहे.

****

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात, आरोपींना सहकार्य करणाऱ्या पोलिसांच्या बदल्या करण्याचे निर्देश, गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले आहेत. कदम यांनी आज मस्साजोग इथं संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. सरकार या प्रकरणी खंबीरपणे देशमुख कुटूंबियांच्या पाठीशी आहे असं त्यांनी यावेळी सांगितलं. या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि सहआरोपींना बीड कारागृहातून इतर कारागृहात हलवण्याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चेचं आश्वासन त्यांनी दिलं.

****

संसदेत वक्फ सुधारणा विधेयक पारीत झाल्याबद्दल लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यातील तळेगाव इथं साखर वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. तळेगाव इथं काही महिन्यांपूर्वीजवळपास ३०० एकर जमिनीवर वक्फ बोर्डाने दावा दाखल केला होता. या पार्श्वभूमीवर सदर कायदा या नागरिकांना दिलासा देणारा असल्याचं सांगण्यात आलं.

****

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी २२ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या आठवीच्या एन.एम.एम.एस. परीक्षेत नांदेडच्या महात्मा फुले हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश मिळवलं आहे. परीक्षेत एकूण ४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, यांपैकी १३ विद्यार्थी केंद्र शासनाच्या एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. तसंच २० विद्यार्थी राज्य शासनाच्या, छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र ठरले आहेत.

****

लातूर जिल्ह्यात काल अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानाची सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी पाहणी केली. अहमदपूर तालुक्यातील नांदुरा आणि लिंगदाळ या गावात भेट देऊन त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला, तसंच या नुकसानाचे पंचनामे तातडीने करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

****

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेस वीजग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. वर्षभरात या योजनेचा महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील १२ हजार ५१९ ग्राहकांनी लाभ घेतला आहे. शासनाकडून अनुदान मिळणाऱ्या या योजनेचा घरगुती ग्राहक आणि निवासी संकुलांनी लाभ घ्यावा, असं आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता, पवनकुमार कछोट यांनी केलं आहे.

****